नैतिक धर्म

मो. क. गांधी

नवजीवन

नैतिक धर्म

मो. क. गांधी

अनुवाद
ब्रिजमोहन हेडा

नवजीवन प्रकाशन मंदिर
अहमदाबाद - ३८० ०१४

अनुक्रम

प्रकाशकाचे निवेदन
अनुवादकाचे दोन शब्द
वाचकांना
प्रस्तावना
प्रकरण १ - सुरुवात
प्रकरण २ - आदर्श नैतिकता
प्रकरण ३ - नैतिक वर्तन म्हणजे काय?
प्रकरण ४ - एखादा उच्चतम नियम आहे काय?
प्रकरण ५ - नैतिकता आणि धर्म
प्रकरण ६ - धार्मिक नीती की नैतिक धर्म?
प्रकरण ७ - सामाजिक आदर्श
प्रकरण ८ - वैयक्तिक नीतिमत्ता

प्रकाशकाचे निवेदन

एथिकल रिलिजन हे पुस्तक मुळात विल्यम मॅकिन्टायर साल्टर, संस्थापक सोसायटी ऑफ एथिकल कल्चर, शिकागो यांनी लिहिले होते व ते अमेरिकेत १८८९साली व इंग्लंडमध्ये १९०५ साली प्रकाशित झाले होते. त्या पुस्तकाचे सार सांगणारे लेख गांधीजींनी इंडियन ओपिनियनमधून ५ जानेवारी १९०७ ते २३ फेब्रुवारी १९०७पर्यंत प्रकाशित केले होते. गुजराती लेखमालेत गांधीजींनी केवळ आठ प्रकरणांचाच सारांश प्रकाशित केला होता. त्या लेखांचा इंग्रजीत करण्यात आलेला अनुवाद 'कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी' खंड ६ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. त्यावरूनच मराठीतील हा अनुवाद प्रकाशित करण्यात आम्हाला आनंद होतो.

मराठीतील या अनुवादाचे वाचक स्वागत करतील अशी आम्हाला अपेक्षा आहे.

अनुवादकाचे ऋणनिर्देश

एथिकल रिलिजनचा अनुवाद करण्याची संधी नवजीवन प्रकाशन आणि श्री. टीआरके सोमैया यांनी मला दिल्यामुळे मी यांचा आभारी आहे. या निमित्ताने गांधीजींच्या विचारांचा अभ्यास करण्याची मला संधी मिळाली.

ब्रिजमोहन हेडा
bbheda@yahoo.com
दिनांक १५ मार्च २०१२

वाचकांना

ज्यांना माझ्या लेखनात रस आहे अशा माझ्या अभ्यासू वाचकांना आणि इतरांना, मी सांगू इच्छितो की मला सुसंगत दिसण्याची किंचितही इच्छा नाही. सत्याच्या माझ्या शोधात मी अनेक विचारांचा त्याग करत आलो आहे आणि नवनव्या गोष्टी शिकत आलो आहे. हे खरे आहे की आता मी म्हातारा होऊ लागलो आहे, परंतु माझा आंतरिक विकास थांबला आहे अथवा माझ्या पार्थिव शरीराच्या मृत्यूनंतर माझी आंतरिक वाढ थांबेल असे मला वाटत नाही. मी माझ्या ईश्वराच्या म्हणजेच सत्याच्या आदेशाचे दर क्षणी पालन करण्याकरिता तत्पर असतो आणि यामुळे माझ्या लेखनातील कोणत्याही दोन गोष्टींमध्ये विसंगती दिसत असेल आणि तरीही त्यांचा माझ्या विवेकीपणावर विश्वास असेल तर त्याने त्या विषयावरील शेवटच्या तारखेचे जे लेखन असेल ते माझे मनोगत आहे असे मानले पाहिजे.

मो. क. गांधी

प्रस्तावना

(विल्यम मॅकिनटायर (संस्थापक सोसायटी फॉर एथिकल कल्चर) यांच्या एथिकल रिलिजन या पुस्तकाधारे गांधीजींनी इंडियन ओपिनियनमध्ये १ जानेवारी १९०७ पासून २३ फेब्रुवारी १९०७ पर्यंत गुजरातीमध्ये एक लेखमाला लिहिली होती. एथिकल रिलिजन हे पुस्तक रॅशनॅलिस्ट प्रेस, शिकागोद्वारे अमेरिकेत मार्च १८८९ साली आणि नंतर इंग्लंडमध्ये १९०५ साली प्रकाशित झाले होते. गुजरातीमध्ये गांधीजींनी पंधरापैकी आठ प्रकरणांचाच सारांश लिहिला होता. कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी या पुस्तकाच्या सहाव्या खंडातून प्रकाशित झालेल्या या लेखांचा मराठी अनुवाद इथे सादर करत आहे. - अनुवादक)

आजकाल जगात दांभिकता फार वाढली आहे. माणसाचा जो धर्म असेल त्याच्या केवळ बाह्य स्वरूपाचा माणूस विचार करतो व त्यामुळे तो आपल्या कर्तव्याला चुकतो. संपत्तीच्या अतीव लोभामुळे, संपत्ती मिळवण्याच्या धडपडीमुळे आपण इतरांना किती हानी पोहोचवतो वा पोहोचवणार आहोत याचा आपण क्वचितच विचार करतो. शैशवावस्थेतील कोवळ्या प्राण्यांना मारून तयार करण्यात आलेले नरम हातमोजे घालण्यात युरोपमधील स्त्रियांना किंचितही संकोच वाटत नाही. संपत्ती गोळा करण्याच्या नादात नैतिकतेच्या अनेक नियमांचा भंग करणारे रॉकफेलर जगातील सर्वात श्रीमंत गृहस्थ कसे झाले हे आता सर्व जगाला माहीत झालेले आहे. युरोप आणि अमेरिकेत सर्वत्र असेच वातावरण असल्यामुळे अनेक लोक धर्मापासून दूर जाऊ लागले आहेत. त्यांचे म्हणणे आहे की आपल्या नावाला जागणारा धर्म जर खरोखरच जगात असता तर अशा प्रकारच्या अमर्याद दुष्टपणाचे अस्तित्व राहूच शकले नसते. हा चुकीचा दृष्टिकोन आहे. ज्याप्रमाणे कामगार स्वतःचे दोष न पाहता अवजारांना दूषण देतो त्याचप्रमाणे माणूस स्वतःमधील वाईटपणाकडे

लक्ष न देता धर्मच फसवा आहे असे म्हणू लागतो व तो मनाला वाटेल त्याप्रमाणे वागू लागतो.

लोकांचा अशा प्रकारचा कल पाहता असे वाटते की जगातील सर्व धर्म नष्ट होऊन जातील आणि लोक नैतिकतेचा पूर्णपणे त्याग करतील. या कल्पनेने मनाचा थरकाप उडतो. त्यामुळे लोकांना परत धर्ममार्गाकडे वळवण्याकरिता अमेरिकेतील व युरोपमधील अनेक लोक पुढे आले आहेत व त्याकरिता ते विविध मार्गांनी प्रयत्न करत आहेत.

सर्व धर्मांचा अभ्यास करण्याकरिता ही संस्था स्थापण्यात आली आहे. सर्व धर्मांचे संशोधन केल्यानंतर असे लक्षात आले की हे धर्म नैतिकतेचे शिक्षण देत नसले तरी त्यांची उभारणी मुख्यत्वेकरून नैतिक तत्त्वांच्या पायावर झाली आहे. याचा अर्थ असा की माणूस धर्माचे पालन करो वा न करो नैतिक मूल्यांचे पालन करणे हे त्याचे कर्तव्य असते आणि जे लोक नैतिक मूल्यांचे पालन करत नाहीत ते ना स्वतःचे भले करू शकतात ना इतरांचे, ना या जगात स्वतःचे कल्याण करू शकतात ना परलोकात. सध्या जगात पसरलेला ढोंगीपणा पाहून जे लोक धर्मापासून दूर गेले आहेत, त्यांना प्रभावित करून परत धर्माकडे आणणे हा या संस्थेचा हेतू आहे. संस्थेचे लोक धर्मांच्या मूलभूत तत्त्वांचा शोध घेतात, त्याबद्दल चर्चा करतात आणि सर्व धर्मांमध्ये दिसून येणा-या नैतिक तत्त्वांबद्दल लेखन करतात व त्यानुसार जगण्याचा प्रयत्न करतात. या धर्माला ते नैतिक धर्म असे म्हणतात. कोणत्याही धर्मावर टीका करणे हे या संस्थेचे उद्दिष्ट नाही. सर्व धर्मांचे लोक या संस्थेचे सदस्य होऊ शकतात. अशा प्रकारच्या संस्थेचा लाभ असा असतो की सदस्य आपापल्या धर्माचे पालन अधिक काटेकोरपणे करू लागतात व त्यातील नैतिक शिकवणुकीकडे ते अधिक लक्ष देऊ लागतात. माणसाने नैतिक तत्त्वांचे पालन केलेच पाहिजे आणि तसे केले नाही तर जगातील सर्व व्यवस्था नष्ट होऊन अखेरीस सर्वनाशाची वेळ आल्याशिवाय राहणार नाही.

श्री साल्टर हे विद्वान अमेरिकी आहेत. त्यांनी या विषयावर एक अतिशय सुंदर पुस्तक प्रकाशित केले आहे. त्यामध्ये कोणत्याही एका विशिष्ट धर्माची चर्चा केलेली नसली तरी त्यात विश्वातील विविध धर्मांमधून शिकवण्यात येत असलेल्या नीतितत्त्वांचे विवेचन करण्यात आले आहे. त्या शिकवणुकीचा आशय काय आहे ते सांगणारे लेख आम्ही दर आठवड्याला प्रकाशित करणार आहोत. लेखक ज्या गोष्टींचा प्रचार करतो त्यानुसार स्वतःही आचरण करतो एवढेच लेखकाबद्दल सांगता येईल. वाचकांना आमची एवढीच विनंती आहे की या नैतिक तत्त्वांमधील जी तत्त्वे त्यांना पटतील त्यानुसार त्यांनी आचरण करण्याचा प्रयत्न करावा. असे झाले तर आमच्या प्रयत्नांचे फळ मिळाले असे आम्हाला वाटेल.

प्रकरण १
सुरुवात

माणसाच्या नैतिक स्वभावामुळेच तो उदात्त आणि चांगल्या विचारांकडे वळतो. विविध प्रकारच्या विज्ञानांमधून जग कसे आहे ते कळते. नीतिशास्त्र मात्र जग कसे असावे ते आपल्याला सांगते. त्यामुळे आपण कसे वागले पाहिजे ते माणसाला कळते. माणसाच्या मनाला दोन खिडक्या आहेत. एकीतून तो स्वतः कसा आहे हे त्याला दिसते तर दुसरीमधून तो कसा असला पाहिजे ते त्याला दिसते. माणसाचे शरीर, बुद्धी आणि मन कसे आहेत यांचा चिकित्सकपणे वेगवेगळा शोध घेण्याचा आपला विचार आहे; परंतु आपण जर इथेच थांबलो तर या सर्वांचे वैज्ञानिक ज्ञान मिळवल्यानंतरही आपला काहीच फायदा होणार नाही. अन्याय, दुष्टपणा, अहंकार आणि अशाच प्रकारच्या गोष्टींमुळे होणारे दुष्परिणाम व हे तिघेही एकत्रित आले की त्यांच्यामुळे कोणती अरिष्टे निर्माण होऊ शकतात हे आपल्याला कळणे आवश्यक आहे आणि केवळ हे ज्ञान मिळवणे पुरेसे नाही, त्यानुसार वर्तनही असले पाहिजे. नैतिक कल्पना वास्तुशिल्पकाराच्या नकाशासारख्या असतात. नकाशात इमारत कशी असेल ते दाखवण्यात आलेले असते. परंतु त्यानुसार इमारत उभारण्यात आली नाही तर तो नकाशा काहीही उपयोगाचा नसतो. त्याचप्रमाणे नैतिक संकल्पनांप्रमाणे आचरण करण्यात आले नाही तर त्यांचाही काही उपयोग नसतो. अनेक लोक असे आहेत की ज्यांना नैतिकतेचे विचार मुखोद्‌गत असतात व त्या विषयावर ते ढीगभर प्रवचनेही देतात. परंतु त्यानुसार ते आचरण करत नसतात आणि तसे करण्याचा त्यांचा हेतूही नसतो. नैतिक तत्त्वे या जगातील आचरणाकरिता नाहीत तर परलोकात, मृत्यूनंतरच्या जगात त्यानुसार आचरण करायचे असते असे मानणारेही काही लोक असतात. एका महान विचारवंताने सांगितले आहे, 'तुम्हाला जर परिपूर्णता हवी

असेल तर तुम्ही आता, या क्षणापासून नैतिक तत्त्वानुसार आचरण करायला सुरुवात केली पाहिजे, मग त्यात कितीही अडथळे आले तरी तुम्ही त्यांची काळजी करता कामा नये.' अशा प्रकारच्या विचारांनी आपण घाबरून जाण्याचे कारण नाही; उलटपक्षी आपली जबाबदारी ओळखून त्यानुसार आचरण करताना आपल्याला आनंद व्हायला पाहिजे. ऑबरकोचे यांच्या आधी शूरवीर अर्ल ऑफ पेम्ब्रूक जेव्हा अर्ल ऑफ डर्बीकडे आले तेव्हा युद्धात आधीच विजय झालेला पाहून ते आपल्या पुतण्याला म्हणाले, 'मला निरोप पाठवल्यानंतर माझी वाट न पाहता माझ्या शत्रूशी लढताना तू सौजन्य दाखवले नाहीस आणि त्याच्याशी तू सन्माननीय पद्धतीने वागलासुद्धा नाहीस.' अशा प्रकारे नैतिक जबाबदारी घेऊन जेव्हा लोक वागू लागतील तेव्हाच ते नैतिकतेच्या मार्गाचे अनुसरण करताहेत असे म्हणता येईल. ईश्वर सर्वशक्तिमान आहे, तो परिपूर्ण आहे. त्याच्या करुणेला, चांगुलपणाला आणि न्यायाला सीमा नाही. असे असेल तर आपण त्याचे कायम गुलाम असतानाही नैतिकतेच्या मार्गावरून इकडेतिकडे कसे काय भरकटू शकतो? नैतिकतेच्या तत्त्वाचे अनुसरण करताना एखाद्याला त्यात अपयश आले तर तो त्या तत्त्वांचा दोष नसेल. ते काहीही असले तरी नैतिकतेची बंधने तोडणा-या लोकांनी स्वतःलाच दोष दिला पाहिजे.

नैतिक आचरणाचे पारितोषिक वा बक्षीस अशी काही गोष्ट नसते. माणूस जर काही चांगले काम करत असेल तर तो टाळ्या मिळवण्याकरिता ते काम करत नसतो. तो तसा वागतो कारण त्याने तसेच वागणे आवश्यक असते. अन्न आणि चांगुलपणा यांची तुलना केली तर अशा माणसाकरिता चांगुलपणाचे वर्तन हे एखाद्या पौष्टिक पदार्थासारखे असते. भुकेल्याला कोणी अन्न दिले तर तो अन्न देणा-याचा ऋणी होतो व त्याला आशीर्वाद देतो. त्याचप्रमाणे एखाद्याने जर त्याला चांगले काम करण्याची संधी दिली तर तो त्याचा ऋणी होतो व त्याचे आभार मानतो.

ज्या नैतिक धर्माची आपण चर्चा करतो आहोत त्या धर्मानुसार आचरण करणे म्हणजे केवळ सौजन्यशीलता अंगी बाणवणे नाही. त्याचा अर्थ आपण थोडे अधिक मेहनती व्हायला पाहिजे, थोडा अधिक सुशिक्षितपणा आपल्यामध्ये आला पाहिजे, आपण थोडे अधिक नीटनेटके आणि स्वच्छ झालो पाहिजे. या सर्व गोष्टींचा त्यात अंतर्भाव आहे यात संशय नाही. या गोष्टी नैतिक धर्माला केवळ स्पर्श करतात. परंतु माणसाला जर या मार्गाने पुढे जाण्याची इच्छा असेल तर त्याला यापेक्षा कितीतरी अधिक करावे लागते आणि हे सर्व त्याला केवळ कर्तव्य म्हणून करावे लागत असते. हा आपल्या प्रकृतीचाच एक भाग आहे, भौतिक लाभापोटी आपण असे करत नाही याची जाणीव त्याला असणे आवश्यक असते.

प्रकरण २
आदर्श नैतिकता

आजचा नैतिकतेसंबंधीचा दृष्टिकोन फारसा उच्चकोटीचा नाही. काहींना असे वाटते की नैतिकता वगैरेची फारशी आवश्यकता नसते. इतर काहींचे मत आहे की धर्म आणि नैतिकता यांचा काहीही संबंध नाही. परंतु जगातील धर्मांचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की नैतिकतेशिवाय धर्म अस्तित्वातच राहू शकत नाही. धर्म बहुतांशी ख-या नैतिकतेने व्यापलेला असतो. जो कोणी नैतिकतेच्या नियमांचे पालन केवळ नैतिकतेकरिता करतो तो माणूस धार्मिक आहे असे आपण समजू शकतो. रशियामध्ये असे लोक आहेत की ज्यांनी राष्ट्रकल्याणाकरिता स्वतःला वाहून घेतले आहे. असे लोक खरे नीतिमान असतात. जेरेमी बेन्थॅमने इंग्लंडमधील कायद्याकरिता अनेक सिद्धान्त शोधून काढले, इंग्रजांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून कठोर परिश्रम केले आणि कैद्यांची परिस्थिती सुधारण्याकरिता प्रयत्न केले. अशा व्यक्तीची धार्मिक म्हणून सहज गणना करता येईल.

शिवाय केवळ मळलेल्या वाटेवरून चालून भागू शकत नाही हा आदर्श नैतिकतेचा नियम आहे. जो मार्ग सत्याचा आहे हे आपल्याला माहीत असते त्या मार्गाचे अनुसरण आपण केलेच पाहिजे, मग तो मार्ग परिचित असो वा नसो. वेगळ्या शब्दात सांगायचे तर जेव्हा एखादा विशिष्ट मार्ग बरोबर आहे, योग्य आहे हे आपल्याला माहीत असते तेव्हा न घाबरता त्या मार्गाने वाटचाल करायला आपण सुरुवात केली पाहिजे. अशा प्रकारे आपण नैतिकतेच्या नियमांचे अनुसरण केले तरच आपली प्रगती होऊ शकते. यामुळेच खरी नैतिकता, खरी संस्कृती आणि खरी प्रगती या तिन्ही गोष्टींचे सहअस्तित्व असते.

आपल्याजवळ जे असते त्याची आपल्याला इच्छा नसते असे आपण आपल्या इच्छा तपासल्या तर आपल्याला आढळून येईल. जे आपल्याजवळ नसते त्याची नेहमीच आपल्याला जास्त किंमत वाटत असते. परंतु इच्छा दोन प्रकारच्या असतात : काही इच्छा स्वार्थसिद्धीकरिता असतात. हा इच्छांचा पहिला प्रकार. अशा प्रकारच्या इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे अनैतिक आहे. दुस-या प्रकारची इच्छा आपली प्रगती करण्याकरिता आणि इतरांचे आपल्याकडून कल्याण व्हावे म्हणून धडपड करण्याकरिता आपल्याला सदैव प्रेरित करत असते. आपण जे काही चांगले करतो त्यामुळे आपण फुगून जाण्याचे कारण नसते. आपण स्वतःचे मूल्यन केले पाहिजे. आपल्या मनात सतत अधिकाधिक चांगले होण्याची आणि चांगले काम करण्याची आकांक्षा असली पाहिजे. अशा प्रकारच्या आकांक्षेकरिता धडपडण्यात खरी नैतिकता असते.

आपल्याला जर स्वतःचे घर वा कुटुंब नसेल तर त्याबद्दल लाज वाटण्याचे काहीही कारण नाही. परंतु आपले घर असेल व त्याचा आपण दुरुपयोग करत असू, अथवा आपला व्यवसाय असेल आणि तिथे आपण खोटेपणा करत असू तर आपण नैतिकतेपासून भरकटलो असे समजावे. जे करणे योग्य असते ते करण्यात नैतिकता

आहे. काही उदाहरणांद्वारे आपण नैतिकतेची गरज सिद्ध करू शकतो. ज्या कुटुंबांमध्ये अनैतिकता, फूट वा असत्याचे वातावरण असते त्या कुटुंबांच्या नशिबात विध्वंस असतो हे आपल्या लक्षात येईल. व्यापार आणि व्यवसायाचेच उदाहरण घ्यायचे तर सत्याचरण करण्याची गरज नाही असे म्हणणारा एकही व्यापारी सापडणार नाही. न्याय आणि चांगुलपणा यांचा प्रभाव बाहेरून जाणवत नसतो; हे गुण मुळातच आपल्यामध्ये आहेत. चारशे वर्षांपूर्वी युरोपमध्ये अन्याय आणि असत्य यांचा बराच बोलबाला होता. त्यामुळे लोकांना क्षणाचीही स्वस्थता नसे. नैतिकता नसल्यामुळे तेथील लोकांची अशी अवस्था झाली होती. सगळ्या नैतिक नियमांचे सार आपण लक्षात घेतले तर मानवजातीच्या कल्याणाकरिता काही तरी करण्यातच खरी व सर्वोच्च कोटीची मानवता आहे. या किल्लीने नैतिकतेचा खजिना आपण उघडला तर नैतिकतेच्या इतर सर्व तत्त्वांचाही शोध तिथे लागू शकेल.

या सर्व प्रकरणांच्या शेवटी आम्ही नैतिकतेसंबंधी गुजराती आणि उर्दू कवींच्या काही कविता प्रकाशित करणार आहोत. आम्हाला आशा आहे की वाचक या कवितांचे पाठांतर करून त्यांचा लाभ घेतील. श्रीयुत मलबारी यांच्या 'आदमी अने तेनी दुनिया' यातील काही उता-यांपासून आपण सुरुवात करू या. (श्री मलबारी यांच्या कविता इथे उद्धृत केलेल्या नाहीत.)

प्रकरण ३
नैतिक वर्तन म्हणजे काय?

विशिष्ट वर्तन नैतिक आहे असे केव्हा म्हणता येऊ शकते? अनैतिक आणि नैतिक या गोष्टींमधील विरोध दाखवणे हा या प्रश्नामागील हेतू नाही. उलट दैनंदिन जीवनात आपण अनेक अशा गोष्टी करत असतो ज्या नैतिक आहेत असे काही लोक समजतात व ज्यांच्याविरुद्ध परंपरागत दृष्टिकोनातून आपण काहीच बोलू शकत

नाही. अशा गोष्टींचा आपण विचार करू या. आपल्या बहुतेक क्रिया बहुधा न-नैतिक असतात. त्यांच्यामध्ये सामान्यपणे नैतिकतेचा प्रश्न उपस्थित होत नसतो कारण बहुतेक वेळा आपण प्रस्थापित परंपरांप्रमाणे वर्तन करत असतो. अशा प्रकारचे परंपरागत वर्तन करणे अनेकदा आवश्यकही असते. अशा प्रकारच्या कोणत्याच नियमाचे आपण पालन केले नाही तर गोंधळाशिवाय काहीही निर्माण होणार नाही आणि समाज, सामाजिक दळणवळण या गोष्टी संपुष्टात येतील. असे असले तरीही केवळ परंपरांचे पालन करण्याला नैतिकता म्हणता येऊ शकत नाही.

नैतिक वर्तन हे आपले स्वतःचे वर्तन असले पाहिजे. ते आपल्या स्वतःच्या उत्स्फूर्त इच्छेतून निर्माण झालेले असले पाहिजे. आपण जर यंत्राप्रमाणे वागलो तर आपल्या वर्तनाबद्दल नैतिकतेचा प्रश्नच उपस्थित होऊ शकत नाही. यंत्राप्रमाणे कृत्य करणे योग्य आहे असे समजून आपण जर एखादे कृत्य केले असेल तरच त्यासंबंधी नैतिकतेचा प्रश्न उपस्थित होउ शकतो. आपण असे करतो तेव्हा आपण विवेकबुद्धीचा वापर करतो व विवेकबुद्धी ही नैतिकतेचा पाया आहे. यांत्रिकपणे काम करणे आणि हेतुपूर्वक काम करणे यातील भेद आपण लक्षात ठेवला पाहिजे. गुन्हेगाराला माफी देणे हे राजाकरिता नैतिक कृत्य असू शकते. राजाचा संदेश घेऊन जाणारा दूत केवळ यांत्रिकपणे काम करत असतो. परंतु राजाचा आदेश घेऊन जाणे हे आपले कर्तव्य आहे आणि त्यामुळे दूत तो आदेश घेऊन जात असेल तर ते कृत्य नैतिक आहे की नाही असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. जो माणूस कृती करताना आपल्या बुद्धीचा आणि विचारशक्तीचा उपयोग करत नाही आणि एखाद्या ओंडक्याप्रमाणे प्रवाहपतित होऊन वाहत राहतो त्याच्या कृतीतील नैतिकता समजून घेण्याचा आधार कोणता? काही वेळा माणूस परंपरा सोडून निर्भेळ चांगुलपणाच्या दृष्टीने स्वतःच्या जबाबदारीवर वेगळे वर्तन करतो. अशा प्रकारचा महानायक वेन्डेल फिलिप्स (अमेरिकी वक्ता, समाजसुधारक आणि

गुलामगिरीविरोधक) होता. जनसभेला संबोधित करताना तो एकदा म्हणाला होता, 'जोपर्यंत तुम्ही स्वतःचे मत बनवणे आणि ते व्यक्त करणे शिकत नाही तोपर्यंत तुम्हाला काय वाटते याची मला चिंता नाही.'

याप्रमाणे आपण जेव्हा आपल्या विवेकाकडे लक्ष देतो तेव्हा आपण नैतिकतेच्या मार्गावर पाऊल टाकतो असे म्हणता येईल. आपण या पातळीवर तोपर्यंत पोहोचू शकत नाही जोपर्यंत - आपला विश्वास आणि अनुभव आपल्या आतील ईश्वर, सर्वांचा ईश्वर आपल्या सर्व वर्तनाचा साक्षीदार नसतो.

आपण केलेले कृत्य चांगले असणे पुरेसे नसते. त्यामागे चांगले काम करण्याचा हेतूसुद्धा असला पाहिजे. म्हणजे वर्तन नैतिक आहे की अजून काही आहे हे कर्त्याच्या हेतूवर अवलंबून असते. दोन माणसांनी अगदी एकसारखे काम केलेले असू शकेल आणि तरीही एकाचे वर्तन नैतिक असू शकेल तर दुस-याचे त्याच्या उलट. उदाहरणार्थ कल्पना करा की एक माणूस करुणेमुळे भुकेल्यांना अन्न देतो तर दुसरा प्रसिद्धीकरिता वा प्रतिष्ठेकरिता वा इतर काही स्वार्थसिद्धीकरिता. दोघेही सारखेच काम करत असले तरी एकाची कृती नैतिक आहे आणि दुस-याची न-नैतिक. वाचकाने या ठिकाणी दोन शब्दांच्या अर्थांमधील भेद लक्षात ठेवला पाहिजे. नैतिक वर्तनाचेही वाईट परिणाम झाल्याचे दिसू शकते. नैतिकतेचा विचार करत असताना आपण करत असलेली कृती चांगली आहे व ती करण्यामागील आपला हेतूही चांगला आहे हे पाहणे आवश्यक असते. त्या कृतीचा परिणाम आपल्या हातात नसतो. फळ देणारा केवळ ईश्वरच आहे. अलेक्झांडरला इतिहासकार 'महान' म्हणतात. विश्वविजयाकरिता तो जिथे कुठे गेला तिथे तो ग्रीक भाषा आणि ग्रीक संस्कृती घेऊन गेला. परंतु हे सर्व करण्यामागे अलेक्झांडरचा हेतू विजयश्री खेचून आणणे आणि नावलौकिक मिळवणे एवढाच होता. त्यामुळे अलेक्झांडरचे वर्तन नैतिक होते असे कोण म्हणू

शकेल? त्याला 'महान' म्हणणे ठीक आहे परंतु त्याला नैतिक म्हणता येऊ शकत नाही.

याप्रमाणे विचार केला असता असे सिद्ध होते की चांगल्या हेतूने केलेले नैतिक कृत्यही पुरेसे नसते. असे कृत्य करण्याचे माणसावर बंधनही नको. भीतीपोटी एखादे वर्तन झाले असेल तर त्यात नैतिकता नसते. मी जर माझ्या ऑफिसमध्ये उशिरा गेलो तर मी माझे पद गमवू शकतो. त्याचप्रमाणे माझी साधी राहणी आणि अहंकारविरहितता यांच्याकरिता माझी आर्थिक परिस्थिती कारणीभूत असेल आणि वेगळ्या प्रकारची राहणी मला परवडण्यासारखी नसेल तर माझी राहणी नैतिकतेच्या कसोटीला उतरू शकत नाही. परंतु मी श्रीमंत असूनही जगातील दुःख आणि गरिबी पाहून सुखासीन व ऐषआरामाचे जीवन जगण्याऐवजी साधे आणि सरळ जीवन जगण्याचे ठरवत असेन तर माझे वागणे नैतिकतेच्या वर्गातील होईल. तसेच कामगारांनी काम सोडून जाऊ नये म्हणून जर मालक कामगारांशी चांगला वागत असेल आणि त्यांना अधिक पगार देत असेल तर त्याचे वागणे स्वार्थीपणाचे होईल. उलट आपली संपन्नता कामगारांवर अवलंबून आहे हे लक्षात घेऊन मालक कामगारांच्या कल्याणाचा विचार करत असेल व त्यांच्याशी प्रेमाने वागत असेल तर त्याचे वर्तन नैतिक आहे असे म्हणता येईल. याचाच अर्थ एखादी कृती नैतिक होण्याकरिता ती करण्याची सक्ती वा बंधन नसावे. बंडखोर शेतकरी आपल्या हक्कांची मागणी करण्याकरिता संतापून रिचर्ड राजा (दुसरा) याच्याकडे गेले तेव्हा परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन राजाने आपल्या सहीशिक्क्यानिशी शेतक-यांना त्यांच्या हक्काच्या सनदी बहाल केल्या. परंतु धोका टळल्यानंतर याच राजाने शेतक-यांकडून बळजबरीने सनदेचे ते कागदपत्र काढून घेतले. रिचर्ड राजाचे पहिले वर्तन नैतिक होते आणि दुसरे अनैतिक असे जर आपण म्हणालो तर ती चूक होईल. त्याची पहिली कृतीसुद्धा भीतीपोटीच झालेली होती व तिच्यात नैतिकतेचा अंशही नव्हता.

ज्याप्रमाणे भीतीमुळे वा बळजबरीने केलेले वर्तन नैतिक असू शकत नाही त्याचप्रमाणे स्वार्थाने प्रेरित होऊन केलेले वर्तनही नैतिक असू शकत नाही. याचा अर्थ असा नाही की स्वार्थामुळे प्रेरित होऊन केलेले सर्व वर्तन व्यर्थ असते, अशा वर्तनाला नैतिक म्हणणे हे नैतिक संकल्पनेची प्रतिष्ठा कमी करणारे व नैतिकतेची निंदा करण्यासारखे होईल. एक उत्तम धोरण म्हणून प्रामाणिक असणा-या व्यक्तीचा प्रामाणिकपणा फार काळ टिकू शकत नाही. शेक्सपिअरने सांगितल्याप्रमाणे नफ्याच्या प्रेरणेतून निर्माण झालेले प्रेम खरे प्रेम नसते.

ते प्रेम नसते प्रेम
ज्यात झालेली असते भेसळ अहंपणाची
आणि झालेले असते दुर्लक्ष मुख्य मुद्याकडे.

मग हे देवा
तुझ्यावरच का मनापासून करू नये प्रेम,
स्वर्गाचे राज्य मिळवण्याकरिता नाही
आणि नरकापासून सुटका करून घेण्याकरिताही नाही,
नाही काही मिळवायचे आहे म्हणून,
ना एखाद्या पारितोषिकाकरिता,
हे अजर, अमर दयाघना
करायचे आहे मला प्रेम तुझ्यावर
जसे करतोस तू माझ्यावर.
तसेच हे.

ज्याप्रमाणे या जगातील भौतिक लाभ मिळवण्याकरिता केलेले वर्तन न-नैतिक असते त्याचप्रमाणे परलोकातील वैयक्तिक सुखशांतीकरिता करण्यात आलेले वर्तनही न-नैतिक असते. जे वर्तन केवळ चांगुलपणाच्या आवडीखातर करण्यात येते केवळ तेच वर्तन

नैतिक असते. महान ख्रिस्ती संत सेंट झेवियर कळकळीने प्रार्थना करत होते, 'हे देवा माझे मन नेहमी शुद्ध राहू दे.' परलोकातील उच्च स्थानाकरिता वा सुखशांतीकरिता करता ते ईश्वरभक्ती करत नव्हते. ते प्रार्थना करत होते कारण प्रार्थना करणे माणसाचे कर्तव्य आहे असा त्यांचा विश्वास होता. महान साध्वी थेरेसाची इच्छा होती की तिच्या उजव्या हातात मशाल असावी आणि डाव्या हातात पाण्याने भरलेले भांडे. मशालीने तिला स्वर्गातील वैभव जाळून टाकायचे होते तर भांड्यातील पाण्याने नरकातील आग विझवून टाकण्याची तिची इच्छा होती. लोकांनी ईश्वराची सेवा नरकातील यमयातनांच्या भीतीने वा स्वर्गीय सुखांच्या लोभापायी करू नये तर केवळ सेवेकरिता सेवा करावी अशी तिची इच्छा होती. अशा प्रकारे नैतिक राहण्याकरिता माणसाला मृत्यूचासुद्धा शौर्याने सामना करण्याची तयारी ठेवावी लागते. मित्रांशी प्रामाणिकपणे वागायचे आणि शत्रूंचा विश्वासघात करायचा हे भित्रेपणाचे लक्षण आहे. भीतीपोटी करण्यात आलेल्या चांगल्या वर्तनात नैतिकतेचा गुण किंचितही नसतो. हेन्री क्ले हा दयाळूपणाकरिता प्रसिद्ध होता, परंतु आपल्या महत्त्वाकांक्षेकरिता त्याने दयाळूपणाचा त्याग केला होता. अमेरिकेतील वकील डॅनियल वेबस्टर यांच्यात बुद्धिमत्ता, शौर्य आणि उमदेपणा इत्यादी गुण होते. असे असतानाही एकदा त्यांनी आपला प्रामाणिकपणा काही पैशांकरिता विकला होता. एका घृणित कृत्याने त्यांनी आपल्या सर्व सत्कृत्यांवर पाणी फिरवले होते. आपण माणसाच्या मनात प्रवेश करू शकत नाही त्यामुळे माणसाच्या नैतिकतेसंबंधी निर्णय घेणे किती कठीण असते हे यावरून दिसून येते. या प्रकरणाच्या सुरुवातीलाच नैतिक कृत्य कोणते असा जो प्रश्न उपस्थित केला होता त्या प्रश्नाचे उत्तर आता आपल्याला मिळालेले आहे आणि त्याचबरोबर अशा प्रकारचे नैतिक कृत्य करणारी व्यक्ती कशी असायला हवी हेही आपण पाहिले आहे.

प्रकरण ४
एखादा उच्चतम नियम आहे काय?

एखादे वर्तन नैतिक की अनैतिक, चांगले की वाईट यासंबंधी आपण नेहमी निर्णय घेत असतो. काही वर्तनांनी आपले समाधान होते तर तर काहींमुळे नाही. एखादी कृती चांगली वा वाईट हे ती आपल्याकरिता लाभदायक आहे की नाही यावरून ठरत नसते. तो निर्णय घेण्याकरिता आपल्याला अगदी वेगळ्या मापदंडाचा उपयोग करावा लागत असतो. आपल्या मनात काही कल्पना असतात व त्या कल्पनांच्या आधारे आपण इतरांच्या कृतींसंबंधी निर्णय घेत असतो. एखाद्या व्यक्तीने दुस-या व्यक्तीवर अन्याय केला असेल आणि त्यामुळे आपल्यावर कोणताही परिणाम होणार असला वा नसला तरी आपल्याला ती कृती चुकीची वाटत असते. काही वेळा चुकीचे वर्तन करणा-यासंबंधी आपल्या मनात काहीशी सहानुभूती असते. तरीही चुकीचे वर्णन करणा-याचे वर्तन चुकीचे आहे असे सांगताना आपण मुळीच कचरत नाही. काही वेळा आपण घेतलेला निर्णय चुकीचा असू शकतो. प्रत्येक वेळी माणसाच्या हृदयात डोकावून पाहून आपण त्याचे हेतू समजावून घेऊ शकतोच असे नाही. त्यामुळे त्या व्यक्तीसंबंधी आपण बनवलेले मत चुकीचे असू शकते. कृतीमागील हेतू माहीत असला तर कृतीसंबंधी निर्णय घेणे फारसे कठीण नसते. अशा प्रकारच्या कृतींमुळे एखाद्या वेळी आपला वैयक्तिक लाभ होत असला तरी ती कृती चूक असल्याचे आपल्याला मनातून कळलेले असते.

अशा प्रकारे स्पष्ट होते की एखाद्या कृतीची नैतिकता वा अनैतिकता या गोष्टी आपल्या वैयक्तिक स्वार्थावर अवलंबून नसतात. तसेच आपल्या इच्छेवरही या गोष्टी अवलंबून नसतात. नैतिकता आणि सहानुभूती यांच्यामध्ये अंतर आहे. सहानुभूतीमुळे एखादी गोष्ट आपण मुलाला देतो. परंतु त्या गोष्टीमुळे मुलाची हानी होईल हे आपल्याला माहीत असले व तरीही ती गोष्ट आपण मुलाला देणे

अनैतिक असते. सहानुभूती असणे ही नैतिक दृष्टीने चांगली गोष्ट आहे परंतु जर तिला नैतिक बंधन नसेल तर तीच गोष्ट विषारी होते.

नीतीनियमांमध्ये काहीही बदल होत नसतो हेही आपण पाहिले. मते बदलतात, परंतु नैतिकता अबाधित असते. आपले डोळे उघडे असतात तेव्हा आपल्याला सूर्य दिसतो आणि ते बंद असले की सूर्य दिसत नाही. इथे झालेला बदल हा आपल्या दृष्टीतील बदल असतो, सूर्याच्या अस्तित्वात काहीही बदल झालेला नसतो. हीच गोष्ट नीतिनियमांनाही लागू होते. अज्ञानामुळे काय नैतिक काय अनैतिक ते आपल्याला कळत नाही. परंतु एकदा ज्ञानाचे डोळे उघडले की मग नैतिकता काय आहे ते ओळखण्यात अडचण येत नाही. सामान्य माणूस काय बरोबर आणि काय चूक हे पाहण्याची क्वचितच काळजी घेत असतो. बहुधा त्याच्यावर व्यक्तिगत हानिलाभाचा पगडा जास्त असतो व त्यामुळे तो चुकीच्या दृष्टिकोनातून नैतिक-अनैतिक ठरवत असतो. वैयक्तिक स्वार्थापलीकडे जाऊन केवळ नैतिकतेच्या दृष्टिकोनातून विचार करण्याचा काळ माणसाकरिता अजून यायचा आहे. बेकन वा डार्विन यांच्याआधी ज्याप्रमाणे विज्ञान बाल्यावस्थेत होते त्याचप्रमाणे नैतिक संस्कृती अजून बाल्यावस्थेत आहे. सत्य काय आहे हे माणसाला जाणून घेण्याची इच्छा होती. त्यामुळे नैतिकता काय आहे याबद्दलचा विचार करणे सोडून तो निसर्गनियमांचा शोध घेण्यामागे लागला - पृथ्वीच्या फिरण्याच्या गतीचे नियम इत्यादी. पूर्वग्रह बाजूला ठेवून शांतपणे आणि चिकाटीने केवळ आदर्श नैतिकतेचा शोध घेणारे आणि इतर कशामध्येही रस नसणारे असे विद्यार्थी आपल्याला कुठे सापडतील? निसर्गाच्या क्षेत्रात माणूस आज ज्याप्रमाणे विविध शोध लावण्याचा प्रयत्न करत आहे त्याचप्रमाणे जेव्हा नैतिकतेच्या क्षेत्रातील विविध संकल्पनांचा शोध घेण्याकरिता आपले जीवन वाहून घेणारे लोक निघतील तेव्हा आपण नैतिकतेच्या विविध संकल्पना तपासून त्यांना एकत्र एकत्र आणू शकू. विज्ञानाच्या क्षेत्रात भौतिक विषयांसंबंधी वैज्ञानिकांमध्ये ज्याप्रमाणे मतमतांतरे

आढळतात त्याचप्रमाणे नैतिकतेच्या क्षेत्रात मतमतांतरे आढळण्याची शक्यता कमी आहे. ते काहीही असले तरी नैतिकतेच्या संकल्पनांसंबंधी एकमत होण्याची वेळ अजून यायची आहे. परंतु याचा अर्थ असा नाही की आपण काय चूक आणि काय बरोबर हे ओळखूच शकत नाही.

माणसाच्या इच्छा आणि मते यांच्यापलीकडे काय चांगले आणि काय वाईट यांचे मोजमाप करता येईल असे मापदंड असले पाहिजेत आणि त्यांनाच आपण नीतिनियम म्हणू शकतो. जर राज्याचे कायदे असू शकतात तर नैतिकतेचे कायदे का असू शकत नाहीत? नैतिकतेचे कायदे हे राज्याच्या आणि व्यवसायाच्या कायद्यांपेक्षा वेगळे आणि चांगले असतात. 'व्यवसायाचे नियम न पाळता मी गरीब राहण्याचे ठरवले तर तुमचे काय म्हणणे आहे?' असा प्रश्न एखादा विचारू शकतो. अथवा 'मी राज्याचे कायदे तोडले आणि शासनकर्त्यांचा रोष ओढवून घेण्याचे ठरवले असले तर तुमचे काय म्हणणे आहे?' असा प्रश्नही एखादा विचारू शकतो. परंतु एखाद्याने जर विचारले की 'मी खोटे बोललो काय किंवा खरे बोललो काय त्यामुळे काय फरक पडतो' तर ते चालू शकेल का?

ऐहिक नियम आणि नैतिकतेसंबंधीचे नियम यांच्यात महदंतर आहे कारण नैतिकतेचा वास आपल्या हृदयात असतो. एवढेच नाही तर अनैतिक जीवन व्यतीत करणारा माणूससुद्धा मान्य करत असतो की मी चुकीचे वर्तन करतो. चूक कधीही बरोबर होऊ शकत नाही. एवढेच नाही तर अधम लोक जरी नैतिकतेचे नियम पाळत नसले तरी ते नैतिकतेचे ढोंग करत असतात. अशा प्रकारे नैतिकतेचे नियम पाळलेच पाहिजे हे ते अप्रत्यक्षपणे मान्य करत असतात. नैतिकतेची महत्ता ही अशी आहे. ती ना परंपरेची फिकीर करते ना लोकमताची. जोपर्यंत या गोष्टी नीतिनियमांशी सुसंगत असतात, तोपर्यंतच नैतिक व्यक्तीला परंपरा वा लोकमत बंधनकारक असते.

हे नीतिनियम कुठून येतात? हे नियम राज्याद्वारे तयार करण्यात

येत नसतात कारण वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळे कायदे असतात. सॉक्रेटीस त्याच्या काळात ज्या नीतिनियमांचे पालन करत होता त्या नीतिनियमांना त्या काळातील अनेक लोकांचा विरोध होता. परंतु आज जग मान्य करते की तो पाळत असलेली नीती आजही कायम आहे आणि उद्याही कायम राहणार आहे. रॉबर्ट ब्राउनिंग म्हणतो, 'सैतानाने जरी द्वेष आणि असत्य हे जागतिक नियम असल्याचे घोषित केले तरीही न्याय, चांगुलपणा आणि सत्य इत्यादी दैवी गुण म्हणून कायम राहतीलच.' यावरून नीतिनियम सर्वोच्च आणि दैवी आहेत असा निष्कर्ष आपण काढू शकतो.

लोक वा व्यक्ती काळाच्या अंतापर्यंतही अशा नियमांचे उल्लंघन करू शकत नाहीत असासुद्धा निष्कर्ष आपण काढू शकतो. कोणी तरी सांगितल्याप्रमाणे भयानक वादळही अखेरीस शमल्याशिवाय राहत नाही, परंतु अनैतिक माणसाच्या विनाशाला सीमा नसते.

असिरिया आणि बॅबिलोनयाचा पापाचा घडा फुटल्याशिवाय राहू शकला नाही. रोम जेव्हा अनैतिकतेच्या मार्गावरून चालू लागला तेव्हा तेथील मोठमोठ्या लोकांनाही त्याला वाचवणे शक्य झाले नाही. प्राचीन ग्रीसचे लोक कर्तबगार होते. तरीही त्यांची कला आणि तत्त्वज्ञान अमर होऊ शकले नाही. फ्रान्समधील क्रांती म्हणजे अनैतिकतेविरुद्ध करण्यात आलेला उठावच होता. अशीच गोष्ट अमेरिकेचीही आहे. वेन्डेल फिलिप्स हे सद्‌गृहस्थ म्हणत असत की अनैतिकतेला सिंहासनावर बसवले तरी ती तिथे टिकून राहू शकत नाही. या अद्‌भुत नैतिक नियमाचे पालन करणा-या माणसाला समृद्धी प्राप्त होते; या नियमाचे पालन करणारे कुटुंब टिकून राहते व या नियमानुसार वागणा-या समाजाचा सतत उत्कर्ष होत असतो. या उच्चतम नियमाचे पालन करणा-या राष्ट्रांत शांतता आणि सुख यांचे अधिराज्य असते. (यानंतर मुळात काव्यदोहनमधील कविता देण्यात आली होती.)

प्रकरण ५
नैतिकता आणि धर्म

एखाद्याला या प्रकरणाचा मथळा विचित्र वाटू शकेल. सामान्यपणे असे समजले जाते की नैतिकता आणि धर्म या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत आणि तरीही या प्रकरणात नैतिकता हाच धर्म आहे या मताचा मी विचार करणार आहे. यामुळे लेखक वैचारिक गोंधळाचा दोषी आहे असा काही वाचकांचा समज होऊ शकतो. अशा प्रकारचा ठपका दोन प्रकारच्या दोन बाजूंकडून येऊ शकतो - धर्म नैतिकतेपेक्षा काही अधिक आहे असे वाटणा-या लोकांकडून आणि जिथे नैतिकता आहे तिथे धर्माची गरजच नाही असे मानणा-यांकडून. असे असले तरीही या दोघांचा निकटचा संबंध दाखवण्याचा लेखक इथे प्रयत्न करणार आहे. नैतिक धर्मावर आधारित समाज अथवा धार्मिक नैतिकतेवर विश्वास असणारा समाज नैतिकतेच्या माध्यमातून धर्माला ओळखतात.

धर्माशिवायही नैतिकता अस्तित्वात असू शकते अथवा नैतिकतेशिवायही धर्म असू शकतो असा सर्वसामान्यपणे समज असतो हे मान्य केले पाहिजे. आपल्याला असे अनेक लोक भेटू शकतात ज्यांचे वर्तन अनैतिक असते आणि ते करत असलेल्या अनेक वाईट कृत्यांनंतरही आपण धार्मिक असल्याचा त्यांचा दावा असतो. दुसरीकडे ब्रॅडलॉसारखे असे नीतीमान लोक आहेत ज्यांना स्वतःला नास्तिक म्हणवून घेण्यात अभिमान वाटतो आणि धर्माच्या नावापासूनही ते दूर पळतात. हे दोन्ही दृष्टिकोन चुकीचे आहेत. पहिला दृष्टिकोन असलेले धर्माच्या नावाखाली अनैतिकतेचे आचरण करत असतात. त्यामुळे हे लोक चूक तर करत आहेतच शिवाय यांच्यापासून समाजाला धोकाही आहे. त्यामुळे वैज्ञानिक आणि बौद्धिक दृष्टीने सखोल विचार केला असता धर्म आणि नैतिकता हे सोबत असतात आणि ते सोबत असणे आवश्यकही आहे हे या

प्रकरणात दाखवण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

एकत्र राहणा-या लोकांनी परस्परांशी कसे वागायचे यासंबंधी सामाजिक परंपरांचे पालन करण्यातच नैतिकता आहे अशी सुरुवातीला मान्यता होती. स्वाभाविकतःच त्या परंपरांमधील चांगल्या परंपरा काळाच्या ओघात टिकल्या आणि वाईट परंपरा नष्ट झाल्या. वाईट परंपरा नष्ट झाल्या नसत्या तर त्यांनी समाजाला दुबळे केले असते आणि परिणामी समाज नष्ट झाला असता. आजसुद्धा ही प्रक्रिया सुरू असल्याचे दिसते. लोक विचार न करता परंपरांचे पालन करत असतील तर ती गोष्ट नैतिकही नसते आणि अनैतिकही नसते. परंतु असे असले तरी वर सांगितल्याप्रमाणे समाजात ज्या चांगल्या परंपरा असतात त्यानुसार वर्तन करणे हे नैतिकतेचे लक्षण आहे असे समजले जाते.

याशिवाय लोकांना धर्माचे बहुधा केवळ वरवरचे ज्ञान असते. अनेकदा तर लोक समोर असलेला संभाव्य धोका टाळण्याचा एक उपाय म्हणूनच धर्माचे पालन करत असतात. अशा प्रकारे भीतीपोटी उपजलेल्या प्रेमामुळे केलेल्या कृतींचे उदात्तीकरण करून त्यांना धार्मिक म्हणणे गैर आहे. परंतु अखेरीस असा काळ येतो जेव्हा नैतिकतेचे पालन सदसद्विवेकबुद्धी वापरून करतात. असे वर्तन ते विचारपूर्वक आणि मुद्दाम करतात आणि ते वर्तन करताना ते हानिलाभाचा, जगण्याचा वा मृत्यूचा विचार करत नसतात व परिणामाच्या भीतीने त्यापासून माघार घेण्याचीही त्यांची तयारी नसते. त्याकरिता आपल्या सर्वस्वाचा त्याग करण्याचीही त्यांची तयारी असते.

धर्माचा आधार नसताना अशा प्रकारची नैतिकता कशी टिकू शकेल? माणूस स्वतःलाच सांगतो, 'जर मी याचे इतकेसे नुकसान केले तर माझा बराच लाभ होऊ शकेल. मग याचे एवढेसे नुकसान केले तर काय हरकत आहे? इतरांची हानी करून मिळवलेला नफा हा मुळी नफा नसतोच उलट असे वर्तन करणा-याची त्यामुळे हानीच होत असते. ही कडू मात्रा असे वर्तन करणा-याच्या घशाखाली कशी

उतरवता येईल? जर्मनीच्या हिताकरिता बिस्मार्कने भयानक अत्याचार केल्याचे वरवर पाहिले तरी दिसून येते. मग त्यावेळी त्याचे शिक्षण कुठे गेले होते? ज्या नीतितत्त्वांचा काहीच दिवसांपूर्वी शाळेतील मुलांसमोर तो पुरस्कार करत होता ती नीतिमूल्ये कुठे गेली होती? या सर्व प्रश्नांचे उत्तर फार स्पष्ट आहे. या सर्व अडचणींच्या काळात तो आपली नैतिकता टिकवून ठेवू शकला नाही कारण तिचे अधिष्ठान धर्मात नव्हते. जोपर्यंत नैतिकतेच्या बिजांना धर्माचे पाणी मिळत नाही तोपर्यंत त्यांची वाढ होऊ शकत नाही. पाण्याशिवाय नष्ट होऊन जातात. त्यामुळे ख-या वा आदर्श नीतिमत्तेत धर्माचा अंतर्भाव असला पाहिजे. हाच विचार वेगळ्या शब्दात मांडायचा तर धर्माशिवाय नैतिकतेचे पालन करणे शक्य होत नाही. याचाच अर्थ नैतिकतेचे पालन धर्माप्रमाणे केले पाहिजे.

याशिवाय असे दिसून येते की महान जागतिक धर्मांमध्ये जे नीतिनियम सांगितलेले आहेत ते जवळपास सारखे आहेत. त्याचप्रमाणे नैतिकता हा धर्माचा पाया आहे असे धर्मसंस्थापकांनी स्पष्ट करून सांगितले होते. जर हा पायाच ढासळला तर वरील इमला खाली पडणे अपरिहार्य आहे. तसेच नीतिमत्तेचा नाश झाला तर तिच्यावर उभारण्यात आलेला धर्माचा इमला खाली कोसळतो.

लेखक पुढे सांगतो की धर्माला नैतिकता म्हणण्यात काहीही चूक नाही. डॉ. कॉईट आपल्या प्रार्थनेत म्हणतात, 'सदाचाराशिवाय माझ्याकरिता दुसरा कोणताच देव नाही.' मनन केले असता लक्षात येते की बगलेत सुरी ठेवून आपण केवळ तोंडाने रामनामाचा जप करत असू तर देव आपल्याला मदत करणार नाही आणि कितीही कळवळून आपण प्रार्थना केली तरी तिला तो उत्तर देणार नाही. कल्पना करा की दोन माणसे आहेत. एकाचा ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास असला तरी त्याच्या कोणत्याही आज्ञेचे तो पालन करत नाही आणि दुसरा ईश्वराचे नाव घेऊन त्याचे अस्तित्त्व मान्य करत नसला तरी तो आपल्या आचरणातून त्याची सतत प्रार्थना करत असतो व

त्याच्या नियमांचे - दैवी नियमांचे पालन करत असतो आणि त्या नियमांच्या कर्त्याची ओळख विसरत नाही. यापैकी कोणत्या माणसाला आपण धार्मिक आणि नैतिक माणूस म्हणून ओळखू? क्षणाचाही विचार न करता कोणीही सांगेल की दुसरा माणूस धार्मिक आणि नीतिमान आहे. (यानंतर बेहरामजी मलबारी यांची कविता देण्यात आली होती, तिचा अनुवाद इथे केलेला नाही.)

प्रकरण ६
धार्मिक नीती की नैतिक धर्म

(या प्रकरणाच्या सुरुवातीला गांधीजींनी 'डार्विनचे नीतिशास्त्राबद्दलचे विचार' या मथळ्याखाली पुढील टीप लिहिली होती.)

(या प्रकरणाची सुरुवात करण्याआधी डार्विनची माहिती करून घेणे आवश्यक आहे. डार्विन हा गत शतकातील एक महान इंग्रज सद्‌गृहस्थ होता आणि त्याने विज्ञानातील अनेक शोध लावले होते. त्याची स्मरणशक्ती आणि निरीक्षणशक्ती अद्‌भुत होती. त्याने लिहिलेल्या काही पुस्तकांचे वाचन आणि चिंतन करणे आवश्यक आहे. माणूस एका विशिष्ट प्रकारच्या माकडापासून कसा अस्तित्वात आला ते त्याने भरपूर पुरावे आणि युक्तिवाद यांच्या आधारे दाखवून दिले आहे. माणूस आणि शेपटी नसलेले माकड यांच्या शरीररचनेत बरेच साधर्म्य आहे हेही निरीक्षणांती त्याने सिद्ध केले आहे. हे चूक की बरोबर याचा आपल्या विषयाशी काहीही संबंध नाही. नैतिकतेच्या संकल्पनांचा मानवजातीवर कसा परिणाम झाला आहे तेही डार्विनने दाखवले आहे आणि अनेक विद्वानांचा डार्विनच्या लेखनावर विश्वास असल्यामुळे आमच्या लेखकाने सहाव्या प्रकरणात या विषयावरील आपले विचार मांडले आहेत.)

जे चांगले आणि योग्य आहे ते स्वेच्छेने केले तर त्यातून माणसाच्या मनाचा उमदेपणा दिसतो. ज्याप्रमाणे वा-याबरोबर ढग

इकडेतिकडे वाहवत जातो त्याप्रमाणे वाहवत न जाता आपल्या भूमिकेवर ठाम राहून योग्य वर्तन करणे ही माणसाच्या उमदेपणाची खरी खूण असते. असे असले तरी वातावरणामुळे आपल्या सहजप्रवृत्ती आपल्याला कुणीकडे नेऊ इच्छितात हेसुद्धा आपण माहीत करून घेतले पाहिजे. आपल्याला माहीत असते की प्रत्येक बाबतीत आपल्या जीवनावर आपला ताबा नसतो; काही बाह्य परिस्थिती अशी असते की जिच्याशी जुळवून घेणे आपल्याला भाग पडत असते. उदाहरणार्थ ज्या देशात हिमालयासारखी थंडी असेल तिथे आपल्याला आवडो वा न आवडो शरीर ऊबदार ठेवण्याकरिता भरपूर कपडे घालावे लागतात. याचाच अर्थ आपल्याला सारासार विचार करून वागावे लागते.

त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की नैतिकतेने वागण्याकरिता आपल्याला वातावरण प्रेरित करत असते काय? की आजूबाजूला कार्यरत असलेल्या शक्तींचा नीतिमत्तेशी काहीही संबंध नसतो?

या ठिकाणी डार्विनच्या दृष्टिकोनाचा विचार करणे भाग पडते. नीतिशास्त्रातील तत्त्ववेत्ता म्हणून जरी डार्विन लिहीत नसला तरी नैतिकता आणि वातावरण यांच्यामध्ये किती निकटचा संबंध आहे हे त्याने दाखवून दिले आहे. नैतिकतेला काहीही महत्त्व नाही, शारीरिक शक्ती आणि मानसिक क्षमता यांनाच खरे महत्त्व आहे असे ज्यांना वाटते त्यांनी डार्विनचे विचार वाचणे आवश्यक आहे. डार्विनच्या सांगण्यानुसार इतर प्राण्यांप्रमाणे माणसामध्येही स्वतःचा बचाव करण्याची सहजप्रेरणा असते. तो असेही सांगतो की जीवनसंघर्षात जे टिकून राहतात ते यशस्वी झाले असे म्हणता येईल. याचाच अर्थ ज्यांना जीवनसंघर्षात टिकून राहण्यात यश मिळत नाही ते लुप्त होतात. परंतु टिकून राहण्याचा हा गुण केवळ शारीरिक सामर्थ्यावर अवलंबून नसतो.

अस्वलाशी वा रेड्याशी शारीरिक सामर्थ्याच्या बाबतीत माणसाची तुलना केली तर त्या बाबतीत ते कितीतरी श्रेष्ठ ठरतील.

त्यांची जर झटापट झाली तर माणूस किती कमी पडतो ते दिसून येईल. असे असले तरी माणूस आपल्या बुद्धिमत्तेच्या बळावर त्यांच्यापेक्षा सामर्थ्यशाली झाला आहे. अशाच प्रकारे माणसाच्या विविध वंशांची तुलना आपण करू शकतो. युद्धामध्ये मोठे सैन्य असलेल्या वा सगळ्यात काटक सैन्य असलेल्या संघाचाच विजय होतो असे नाही. उलटपक्षी एखाद्या पक्षाजवळ कमी सैन्य असले वा ते सैन्य फारसे काटक नसले परंतु त्या पक्षाचा सेनापती श्रेष्ठ असला आणि त्याचे डावपेच उत्तम असले तर त्या पक्षाचाच विजय होत असतो. या उदाहरणामध्ये बुद्धीचे श्रेष्ठत्व आपल्याला दिसून येते.

परंतु डार्विन पुढे असेही म्हणतो की शारीरिक आणि बौद्धिक सामर्थ्यापेक्षा नैतिक शक्ती अधिक श्रेष्ठ असते. आपल्याला अशी अनेक उदाहरणे आढळून येतात जेथे अधिक नैतिक सामर्थ्य असलेली व्यक्ती कमी नैतिक सामर्थ्य असलेल्या व्यक्तीपेक्षा जास्त टिकाव धरते. काही लोक असा अर्थ काढतात की डार्विनच्या म्हणण्यानुसार शक्ती असणेच पुरेसे आहे. याचा अर्थ असा की अखेरीस शारीरिकदृष्टीने बलवान असणा-यांचाच जीवनसंघर्षात विजय होतो. वरवर विचार करणा-यांना कदाचित असे वाटू शकेल की नैतिकतेचा काहीही उपयोग नाही. परंतु डार्विनचा असा दृष्टिकोन मुळीच नाही. अगदी प्राचीन काळापासूनच्या माणसाच्या इतिहासावरून आपल्याला दिसून येते की ज्या वंशांमध्ये नैतिकतेचा अभाव होता ते वंश पूर्णपणे विलयाला गेलेले आहेत. सोडोम आणि गोमरॉह येथील लोक अतिशय अनैतिक होते आणि त्यामुळे आता ते पूर्णपणे नाहीसे झाले आहेत. आजही नीतिमत्ता नसलेल्या वंशांचा हळूहळू कसा विनाश होत चालला आहे ते आपल्याला दिसून येते.

मानववंश टिकून राहण्याकरिता सर्वसामान्य नैतिकतेची कशी गरज असते याची काही उदाहरणे आता आपण पाहू या. शांतपणाने समस्या सोडवणे हा नैतिकतेचा एक भाग आहे. प्रथमदर्शनी असे वाटू शकेल की आक्रमक स्वभावाचे लोक जीवनात पुढे जातात; परंतु

थोडासा विचार करता आढळून येईल की जेव्हा हिंसेच्या तलवारीचा पराभव होतो तेव्हा ती आपल्याच मानेवर कोसळण्याची शक्यता असते. वाईट सवयींपासून मुक्तता हासुद्धा नैतिकतेचा एक भाग आहे. सांख्यिकीने सिद्ध झाले आहे की तिसाव्या वर्षी तापट स्वभाव असलेले इंग्लंडमधील लोक त्यापुढील तेरा-चौदा वर्षेही जगण्याची शक्यता कमी असते. उलटपक्षी तेथील निर्व्यसनी लोकांचे सरासरी आयुष्य सत्तर वर्षे आहे. नैतिकतेचे अजून एक चिन्ह ब्रह्मचर्य आहे. डार्विनने दाखवले आहे की बदफैली माणसे लवकर मरतात. त्यांना एक तर मुले नसतात व असलीच तर ती दुबळी असतात. बदफैली माणूस मनोदुर्बल असतो व कालांतराने तो मंदबुद्धी असलेल्या माणसासारखा दिसू लागतो.

विविध समाजातील नैतिकतेचा विचार आपण करू लागलो तर आपल्याला हीच परिस्थिती दिसून येईल. अंदमान बेटात राहणा-या लोकांमधील नवरा आपल्या बायकोची काळजी मुलाचे अंगावर पिणे बंद होईपर्यंत आणि तो इकडेतिकडे फिरू लागेपर्यंतच घेतो. नंतर तो तिला सोडून देतो. याचा अर्थ त्यांच्यामध्ये इतरांची काळजी घेण्याची प्रवृत्ती कमी असते आणि ते केवळ स्वार्थी भावनेने प्रेरित होऊन काम करत असतात. परिणामी त्यांचा वंश हळूहळू नष्ट होत आहे. डार्विनने दाखवून दिले आहे की प्राण्यांमध्येसुद्धा काही प्रमाणात परोपकारी वृत्ती दिसून येते; भित्रे पक्षीसुद्धा आपल्या पिल्लांचे संरक्षण करत असताना अद्‌भुत साहस दाखवतात. यावरून असे दिसते की प्राण्यांमध्ये निःस्वार्थीपणा नसता तर या जगात गवत आणि विषारी झाडाझुडपांशिवाय जीवन क्वचितच आढळून आले असते. माणूस इतर प्राण्यांपेक्षा अधिक निःस्वार्थी आहे हे माणूस आणि इतर प्राणी यांच्यामधील मुख्य अंतर आहे. आपल्या शक्तीच्या प्रमाणात माणसाने इतर प्राण्यांपेक्षा अधिक त्याग केला आहे, म्हणजे आपल्या अपत्यांकरिता, कुटुंबाकरिता, समाजाकरिता आणि राष्ट्राकरिता माणसाने अधिक त्याग केला आहे.

नैतिक सामर्थ्य सर्वश्रेष्ठ असते हे डार्विनने स्पष्टपणे दाखवून दिले आहे. प्राचीन ग्रीसमधील लोकांमध्ये आजच्या युरोपमधील लोकांपेक्षा अधिक बुद्धिमत्ता होती. परंतु ग्रीसच्या लोकांनी जेव्हा नैतिकता सोडून दिली तेव्हा त्यांची बुद्धीच त्यांची वैरी झाली. राष्ट्र ना संपत्तीमुळे टिकतात ना सैन्यामुळे. ती टिकतात केवळ सदाचारामुळे. हे सत्य लक्षात ठेवून परोपकारी वृत्तीनुसार आचरण करणे माणसाचे कर्तव्य आहे आणि परोपकारी वृत्तीच नैतिकतेचे सर्वोच्च स्वरूप आहे.

प्रकरण ७
सामाजिक आदर्श

काही वेळा असे सांगण्यात येते की सर्व प्रकारच्या नैतिकतेत सामाजिक संबंध अध्याहृत असतात. हे म्हणणे बरोबर आहे. उदाहरणार्थ न्यायाधीशांत योग्य न्यायभावना असेल तर न्यायालयात जाणा-या लोकांना समाधान मिळते. याचप्रमाणे प्रेम, दयाळूपणा, औदार्य आणि अशाच प्रकारच्या इतर गुणांचे संवर्धन आणि अभिव्यक्ती इतरांच्या सहवासात होऊ शकते. निष्ठेचा गुणही इतरांच्या संदर्भातच असू शकतो. राष्ट्रभक्तीबद्दलही वेगळे काही सांगण्याची आवश्यकता नाही. खरे सांगायचे तर नैतिकतेचे असे एकही अंग नाही ज्यामुळे केवळ नीतीने वागणा-याचाच लाभ होतो. काही वेळा असे सांगण्यात येते की सत्यवादिता आणि अशाच इतर काही गुणांचा इतरांशी काहीही संबंध नसतो, ते पूर्णपणे वैयक्तिक असतात. परंतु खरे बोलल्यामुळे इतरांचे होणारे नुकसान वा हानी आपण टाळतो, जसे खोटे बोलून आपण समोरच्या व्यक्तीची फसवणूक करतो आणि त्याला दुखवतो.

याचप्रमाणे जेव्हा माणसाला विशिष्ट कायदे वा परंपरा पटत नाहीत आणि तो समाजातून निवृत्त होतो तेव्हाही त्याच्या आचरणामुळे

समाज प्रभावित होतच असतो. असा माणूस आपल्या कल्पनेतील आदर्श जगात राहत असतो. आपल्या कल्पनेतील आदर्श जग अजून जन्माला आले नाही याची त्याला खंत नसते. नैतिकतेचे सध्याचे मापदंड तितकेसे चांगले नाहीत एवढी गोष्ट त्याच्याकरिता त्या मापदंडांना विरोध करण्यासाठी पुरेशी असते. इतर लोकांनी आपले जीवन बदलवावे आणि त्यांनी आपल्याप्रमाणे नैतिकतेने वागावे याकरिता तो त्यांना प्रेरित करील. पैगंबरांनी अशाच प्रकारे जगाला वेगळ्या वाटेवर नेण्याचा प्रयत्न केला.

जोपर्यंत माणूस स्वार्थी असतो व इतरांच्या सुखदुःखाची त्याला पर्वा नसते तोपर्यंत तो एखाद्या जनावराइतका किंबहुना त्यापेक्षाही वाईट असतो. माणूस जेव्हा आपल्या कुटुंबाची काळजी घेतो तेव्हा तो जनावरांपेक्षा चांगला आहे असे आढळून येते आणि जेव्हा तो आपल्या कुटुंबाच्या व्याख्येत समाजाचा वा राष्ट्राचाही समावेश करतो तेव्हा त्याचे मानवीपण अजूनच उठून दिसते. आणि तो जेव्हा संपूर्ण मानववंशाला आपल्या कुटुंबाप्रमाणे समजू लागतो तेव्हा तो आणखी काही पाय-या वर चढतो. माणूस जोपर्यंत मानवतेच्या सेवेत अपुरा पडतो तोपर्यंत तो प्राण्याच्या पातळीवरच असतो वा तो तेवढ्या प्रमाणात अपुरा असतो असे म्हणावे लागेल. माझ्या पत्नीला झालेल्या इजेमुळे मला दुःख होत असेल वा समाजावरील संकटांमुळे मला वाईट वाटत असेल, परंतु माझ्या वर्तुळाबाहेरील लोकांबद्दल जर मला काहीच वाटत नसेल तर स्पष्ट आहे की मला संपूर्ण मानवतेबद्दल काहीही वाटत नाही. परंतु स्वार्थामुळे म्हणा वा भेदभावामुळे म्हणा पत्नी, मुले अथवा समाज यांच्याबद्दलच्या माझ्या भावना त्यांना मी आपले समजतो म्हणून असतात.

सांगायचा अर्थ असा की जोपर्यंत प्रत्येक माणसाबद्दल आपल्याला सहानुभूती वाटत नाही तोपर्यंत आपण ना नीतिमत्तेवर आधारित धर्माप्रमाणे आचरण केलेले असते आणि ना त्याचे आपल्याला काही ज्ञान असते. उच्च नैतिकता ही सर्वसमावेशक

असलीच पाहिजे हे आता आपल्याला कळलेले असल्यामुळे तिने सर्व माणसांना आपल्यामध्ये सामावून घेणे आवश्यक असते. मानव समाजाच्या आपल्याशी असलेल्या संबंधाचा विचार करता प्रत्येक माणसाचा आपल्यावर अधिकार असतो व त्याची सेवा करणे हे आपले कर्तव्य असते. आपला कुणावरही हक्क नाही असे गृहीत धरून आपण वागलो पाहिजे. अशा प्रकारे वागणारा माणूस जगाच्या धावपळीत लोकांच्या पायाखाली चिरडला जाईल असा युक्तिवाद जो करेल तो अडाणीच आहे असे म्हणावे लागेल, कारण ज्या माणसाने स्वतःला अंतःकरणापासून इतरांच्या सेवेकरिता वाहून घेतलेले असेल त्याच्या मदतीकरिता देव नेहमीच धावून येत असतो हा वैश्विक अनुभव आहे.

या नैतिक मापदंडाप्रमाणे सर्व माणसे समान असतात. याचा अर्थ सर्वांचे समान पद असेल वा सर्वांना सारखेच काम करावे लागेल असा नाही. याचा अर्थ एवढाच आहे की मी उच्च पदावर असण्याचे कारण असेल त्या पदाची कर्तव्ये आणि जबाबदा-या पार पाडण्याची माझ्यातील क्षमता. त्यामुळे माझ्यापेक्षा लहान पदावर काम करणारे लोक माझ्यापेक्षा कमी प्रतीचे आहेत असा व्यर्थ समज करून घेण्याचे कारण नाही. समता ही आपल्या मनोवृत्तीवर अवलंबून असते आणि ती मनोवृत्ती आपल्यामध्ये येईपर्यंत आपण मागासलेलेच असतो.

याच नियमाप्रमाणे आपल्या स्वार्थाकरिता कोणतेही राष्ट्र दुस-या राष्ट्रावर राज्य करू शकत नाही. अमेरिकेतील मूळ रहिवाशांना कनिष्ठ पातळीवर ढकलून आपण शासन चालवणे हे अनैतिक कृत्य ठरते. सुसंस्कृत वंश रानटी लोकांच्या संपर्कात येत असेल तर त्या रानटी लोकांना आपल्या पातळीवर आणणे हे सुसंस्कृत वंशाचे कर्तव्य ठरते. याच नियमाप्रमाणे राजा हा आपल्या जनतेचा सेवक असतो, मालक नसतो आणि अधिकारी सत्तेचा आनंद उपभोगण्याकरिता नसतात, लोकांना सुखी करणे हे त्यांचे कर्तव्य असते. लोकशाही असलेल्या राष्ट्रातील लोक जर स्वार्थी असतील तर त्या राष्ट्रातून

काहीही चांगले निष्पन्न होऊ शकत नाही.

शिवाय याच नियमाप्रमाणे समाजातील वा राष्ट्रातील सबळ सदस्यांनी दुर्बलांचे रक्षण केले पाहिजे, त्यांचा छळ करायला नको. अशा प्रकारच्या राज्यात आपला शेजारी गरिबीत खितपत पडलेला पाहणे कोणालाही आवडणार नाही. त्यामुळे तिथे उपासमारीही राहणार नाही आणि कोणाजवळ अतिरिक्त संपत्तीही असणार नाही. उच्च नीतिमूल्यांचे पालन करणारी व्यक्ती कधीही प्रचंड संपत्ती गोळा करू शकत नाही. नीतिमान व्यक्ती आपल्या नैतिकतेकरिता जबाबदार असते आणि तिला परिणामांची चिंता नसते. त्यामुळे आदर्श नीतिमत्तेप्रमाणे फार कमी लोक आचरण करतात याची चिंता करण्याचे कारण तिला नसते. नैतिकतेचे आचरण करणा-या व्यक्तीकडून काही अनैतिक कृत्य घडले आणि त्याकरिता समाजाने कोणतीही प्रतिक्रिया दाखवली नाही तरी ती व्यक्ती स्वतःला अपराधी समजेल.

प्रकरण ८
वैयक्तिक नीतिमत्ता

'याला मी जबाबदार आहे' वा 'हे माझे कर्तव्य आहे' - असा विचार प्रेरणादायी आणि सुंदर असतो. असे वाटते की एक गूढ आणि आश्वस्त करणारा आवाज सांगतो आहे - 'हे माणसा, तुझ्यावर ही जबाबदारी टाकण्यात आली आहे, त्यातील विजयाची वा पराभवाची जबाबदारी तुझीच असेल. तुझ्यासारखा जगात दुसरा कोणीही नाही कारण निसर्गाने अगदी सारख्या दोन वस्तू कधीही निर्माण केलेल्या नाहीत. त्यामुळे तुझे जे कर्तव्य आहे ते जगात दुस-या कोणाचेही असू शकत नाही आणि जर तू ही जबाबदारी पार पाडली नाहीस तर त्यामुळे होणारी हानी तुझ्या खात्यातून वजा केली जाईल.'

'असे कोणते कर्तव्य आहे ज्याकरिता मी स्वतःलाच जबाबदार

धरले पाहिजे?' त्याला या काव्यपंक्तीतून उत्तर देता येईल : 'नका म्हणू माणसाला देव कारण नाही तो देव, परंतु तरीही ईश्वराच्या भव्यतेपासून माणूस नाही वेगळा'.

आणि उत्तर, 'ईश्वराच्या प्रकाशाचा मी किरण आहे. त्यामुळे निश्चिंत राहणे हे माझे कर्तव्य आहे.' दुसरा एखादा उत्तर देऊ शकेल, 'कर्तव्य सहानुभूतीने परिपूर्ण असले पाहिजे आणि त्यात सर्वांबद्दलचा भ्रातृभाव असला पाहिजे'. तिसरा एखादा म्हणू शकेल, 'आईवडिलांचा आदर केला पाहिजे, आपल्या बायकोमुलांची काळजी घेतली पाहिजे आणि आपल्या भावंडांना आणि मित्रांना त्या जबाबदारीतून मुक्त केले पाहिजे'. या सगळ्या गुणांबरोबरच ज्याप्रमाणे मी इतरांचा आदर करतो तसाच माझा स्वतःचा आदर करणे हेसुद्धा माझे कर्तव्य आहे. जर मी स्वतःला ओळखणार नसेन तर मी इतरांना कसा ओळखू शकेन? आणि ज्यांना मी ओळखत नाही त्यांचा मी आदर कसा करू शकेन? अनेकांचे मत असे असते की योग्य वर्तन करण्याची जबाबदारी इतरांच्या संदर्भातच असते आणि आपला इतरांशी संपर्कच नसल्याने माणूस हवे तसे वागू शकतो. ज्या माणसाचा असा दृष्टिकोन असतो त्याला आपण काय बोलतो तेच कळत नसते. या जगात शिक्षेची भीती असल्यामुळे कोणीही मनमानी करू शकत नाही.

आता आपण स्वतःबद्दलचे आपले कर्तव्य काय आहे ते पाहू या. सुरुवातीला आपण आपल्या खाजगी सवयी घेऊ ज्यांची आपल्याशिवाय कुणालाही माहिती नसते. आपण त्यांच्याकरिता जबाबदार असतो कारण त्यांचा आपल्या चारित्र्यावर परिणाम होत असतो. परंतु हे इथेच संपत नाही. आपण त्याकरिता जबाबदार असतो कारण त्यांचा इतरांवरही परिणाम होत असतो. प्रत्येक माणसाला आपल्या इच्छांना नियंत्रणात ठेवावे लागते व आपल्या आत्म्याला व शरीराला स्वच्छ ठेवावे लागते. एक महापुरुष म्हणतो, 'मला माणसाच्या खाजगी सवयी कोणत्या आहेत ते सांगा आणि तो माणूस कसा आहे ते मी तुम्हाला सांगेन.' त्यामुळे आपण अधिक

खाऊपिऊ नये म्हणून आपण आपल्या सर्व भुकांना नियंत्रणात ठेवले पाहिजे. तसे केले नाही तर आपण आपली शक्ती व नावलौकिक या दोन्ही गोष्टी गमावू. जो माणूस इंद्रियजन्य सुखांपासून दूर राहून शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांची काळजी घेत नाही त्याला या जगातील सुखांचासुद्धा उपभोग घेता येत नाही.

आपल्या सहजप्रवृत्तींना शुद्ध ठेवण्याचा हा युक्तिवाद सुरू ठेवत आपण पुढे गेलो तर आपल्या सहजप्रवृत्तींचा उपयोग इतरांच्या मदतीकरिता कसा करता येईल याचाही आपल्याला विचार करावा लागतो. माणसाचे जीवनासंबंधी विशिष्ट ध्येय असले पाहिजे. आपण जर आपल्या जीवनहेतूचा शोध घेतला नाही आणि नैतिक मार्गावरून चालण्यात आपण चुकलो व परिस्थिती नेईल तिकडे वाहून जाऊ लागलो तर सुकाणूविरहित जहाजासारखी आपली स्थिती होईल व अखेरीस खवळलेल्या सागरात आपण जाऊन पोहोचू. माणसाचे जीवनातील सगळ्यात मोठे कर्तव्य मानव समाजाची सेवा करणे आणि सर्व माणसांची परिस्थिती अधिक चांगली व्हावी म्हणून आपल्या परीने प्रयत्नशील राहणे हे आहे. हीच खरी भक्ती आहे, खरी प्रार्थना आहे. तोच दैवी पुरुष असतो जो ईश्वराचे काम करतो. ईश्वराचे नाव घेऊन ढोंगीपणा आणि फसवणूक करणारे अनेक आहेत. पोपट देवाच्या नावाचा जप करतो म्हणून कोणीही त्याला ईश्वरभक्त म्हणणार नाही. मानवी जीवनाला आदर्शाकडे घेऊन जाण्याकरिता मदत करणे ही अशी गोष्ट आहे जी करण्याचे प्रत्येकजण ठरवू शकतो. या दृष्टिकोनातून आई मुलाचे योग्य पद्धतीने संगोपन करू शकते, वकील आपला व्यवसाय करू शकतो, व्यापारी आपला व्यवसाय वा व्यापार सुरू ठेवू शकतो आणि कामगार आपले काम करू शकतो. अशा प्रकारचे निश्चित धोरण ठेवून काम करणारी व्यक्ती नैतिकतेच्या मार्गावरून कधीही भरकटू शकत नाही. तिने जर असे केले तर मानव समाजाला आणण्याचे उद्दिष्ट ती पूर्ण करू शकणार नाही.

या गोष्टीचा आपण थोडा सविस्तर विचार करू या. आपल्या जीवनपद्धतीमुळे मानवी जीवनाची प्रगती होते की अधोगती याचा आपण सतत विचार केला पाहिजे. उदाहरणार्थ व्यापा-याने व्यवसाय करताना 'आपण ग्राहकाची वा स्वतःची फसवणूक तर करत नाही ना?' असा प्रश्न स्वतःला विचारला पाहिजे. या नीतिनियमांप्रमाणे वागणारा वकील अथवा डॉक्टर फीपेक्षा आपल्या अशिलाकडे वा रुग्णाकडे अधिक लक्ष देईल. मुलाचे संगोपन करत असताना आपल्या आंधळ्या प्रेमामुळे वा काही स्वार्थी हेतूमुळे मूल बिघडणार तर नाही ना याची आई काळजी घेईल. याच विचारांनी प्रेरित होऊन कामगारही काम करतील. जर कामगाराने वरील नैतिक मापदंडानुसार काम केले तर त्यामुळे तो या नीतिनियमांचे पालन न करणारे श्रीमंत व्यापारी, डॉक्टर, वा वकील यांच्यापेक्षा चांगला आणि उच्च कोटीचा गणला जाईल. तो कामगार अस्सल नाणे असेल आणि नैतिकतेने न वागणारे व्यापारी, वकील, डॉक्टर वगैरे बुद्धीने श्रेष्ठ असलेली मंडळी खोट्या नाण्यासारखी कुचकामी ठरतील. याहूनही पुढे गेलो तर असे आढळून येईल की माणूस जीवनात कोणत्याही स्थानावर असला तरी त्याच्यामध्ये हे उद्दिष्ट साध्य करण्याचे सामर्थ्य असते. माणसाची किंमत त्याच्या जीवनमार्गावरून ठरते, त्याच्या पदावरून नाही. माणसाच्या जीवनमार्गाचा निर्णय त्याच्या बाह्य वर्तनावरून घेता येऊ शकत नाही तर त्याच्या अंतःप्रवृत्तीवरून घेता येतो. उदाहरणार्थ दोन माणसांपैकी एक माणूस एखाद्या गरीब माणसाला टाळण्याकरिता एक डॉलर देतो आणि दुसरा माणूस एखाद्या गरीब माणसाबद्दल वाटणारी करुणा आणि सहानुभूती यामुळे त्याला अर्धा डॉलर देतो. स्पष्ट आहे की अर्धा डॉलर देणारा खरा नीतिमान असतो तर एक डॉलर देणारा पापी असतो.

थोडक्यात सांगायचे तर तोच माणूस धार्मिक असतो, तोच सुखी असतो आणि तोच संपन्न असतो जो स्वतःशी प्रामाणिक असतो, कोणाहीबद्दल ज्याच्या मनात आकस नसतो, जो कोणाचाही

गैरफायदा घेत नाही आणि नेहमी शुद्ध अंतःकरणाने काम करत असतो. केवळ अशी माणसेच मानव समाजाची सेवा करू शकतात. दमट झालेल्या आगपेटीच्या काडीने लाकडाचा ओंडका कसा पेटवता येणार? जो माणूस स्वतः नैतिकतेचे पालन करत नाही तो इतरांना नैतिकता कसा काय शिकवणार? बुडणारा माणूस दुस-याला बुडण्यापासून कसा काय वाचवू शकेल? नैतिक जीवन जगणारा माणूस जगाची सेवा कशी करावी असा प्रश्न कधीही उपस्थित करत नाही कारण त्याच्या मनात कधीही संशय नसतो. एका मित्राबद्दल मॅथ्यू अर्नोल्ड म्हणतो,

'वाटला तो मला वागण्याबोलण्यावरून संवेदनशील,
आणि जाणवले की तो उदास आहे म्हणून,
दिल्या मी शुभेच्छा त्याला,
उत्तम आरोग्य, यश आणि नावलौकिक मिळावे म्हणून.
परंतु आता देत नाही मी कोणालाही
अशा शुभेच्छा, कारण त्या असतात
त्यांच्या स्वतःच्याच पारितोषिकासारख्या;
त्या घेतात आपली परीक्षा -
आणि अनेकदा बनवतात कठोर आपल्याला
किंवा कमी नम्र, कमी शुद्ध आणि कमी दयाळू.'

एक वेळ होती जेव्हा अर्नोल्डने आपल्या मित्राला आरोग्य, यश आणि नावलौकिक मिळावे म्हणून शुभेच्छा दिल्या. परंतु आता तो अशा शुभेच्छा देत नाही कारण त्याच्या मित्राचे सुख वा दुःख या गोष्टी त्यांच्या अस्तित्त्वावर अवलंबून नसतात. त्यामुळे त्या मित्राची नीतिमत्ता कायम राहावी एवढीच शुभेच्छा तो आता त्याला देतो. इमर्सन म्हणतो, 'संकटे महापुरुषाकरिता संधी असतात.' हीन माणसाजवळील पैसा आणि त्याला मिळालेला नावलौकिक हे त्याच्या आणि जगाच्या दुर्दैवात भरच घालत असतात.'